# चैतन्य साधना



श्री स्वामी समर्थ

## सतत कृतिमग्नता हेच जीवनकार्य

परमसद्गुरु श्रीगजाननमहाराज यांचे कार्य म्हणजे त्यांनी ज्ञानमय जीवनपद्धती (धर्म) लोकांपुढे ठेवली. धर्म म्हणजे जीवनरीत वा पद्धती. उदाहरणार्थ काही लोक तपोमय जीवन व्यतीत करतात. काया-वाचा-मन आणि एकूणच व्यवहारात चोवीस तास बारा महिने त्यांच्या वागण्यात फरक पडत नाही. ती जीवनरीत, ती त्यांची कर्मरीत. राजा हर्षवर्धन यांची दान ही जीवनरीत होती. दर पाच वर्षांनी आपली सारी संपत्ती ते दान करून टाकीत असत. एकदा तर त्यांनी अंगावरचे वस्त्रही दान दिले आणि मग आपल्या बहिणीकडून तात्कालिक मागून घेतले. याचा अर्थ संपूर्ण संपत्तीचे दान ही जीवनरीत आहे. दानात आनंद आणि दान हा जीवनव्यवहार ही त्या दानशूर राजाची रीत. दानवीर कर्ण यापेक्षा वेगळा नव्हता. दानात त्याचा हात सदैव पुढे होता. येथे राजा हर्षवर्धनांबद्दल एक सांगायला हवे. दर पाच वर्षांनी सारी संपत्ती दान करीत. याचा अर्थ पाच वर्षात त्यांच्याकडे पूर्ववत संपत्ती जमत असे. पण त्यांना त्याबद्दल ममत्व (माझे, माझे हा भाग) नव्हते.

ही जी विविध महापुरुषांची कृती वा कार्य वा कर्म, त्याचा खुलासा करताना परमसद्गुरु म्हणाले, ''विशेष व्यक्तिगत कर्मांना विकर्म म्हणतात. कर्म योग्य कृती. अकर्म चुकीची वा अयोग्य कृती आणि विकर्म म्हणजे विशेष व्यक्तिगत कर्म.'' विकर्माची दोन प्रसिद्ध उदाहरणे आहेत. या देशातील सर्वांना ती ठाऊक आहेत :

बिभीषण अपने भाई त्यजे।
त्यजे तात प्रल्हाद।।



एस. के. कुलकर्णी

आपला थोरला भाऊ रावण याची आज्ञा बिभीषणाने मानली नाही. तद्वत प्रल्हादाने वडिलांचे म्हणणे स्वीकारले नाही. या कथा जुन्या व पौराणिक वाङ्मयातील म्हटल्या तरी, विकर्म समजावून देण्यास समर्थ आहेत. बिभीषणाने थोरला भाऊ सोडून परंपरेविरुद्ध कृती केली. तीच गोष्ट प्रल्हादाची. त्याने परंपरा मोडली. वडिलांचे म्हणणे मानले नाही.

सांगण्याचा मुद्दा हा की एखाद्या मोठ्या व उच्च कारणासाठी परंपरागत वा शिष्टसंमत कर्माचा (आचाराचा) त्याग करणे आणि वेगळी कृती आचरणे, याला विशेष व्यक्तिगत कर्म - विकर्म, म्हणतात. परमसद्गुरूंनी आणखी एक खुलासा एकदा केला. ते म्हणाले, ''आमच्याजवळ वेळ थोडा आहे. त्यामुळे आम्ही प्रत्येक क्षण उपयोगात आणतो. (याचाच अर्थ आम्ही सतत कर्मरत असतो). उंदराची सवय कुरतडण्याची असते, त्याप्रमाणे काळ आयुष्य कुरतडत राहतो. (त्यासाठी त्याची जाणीव ठेवून प्रत्येक क्षण कर्मरत राहून आयुष्याचा जास्तीत जास्त रास्त उपयोग करणे).'' दुसऱ्या प्रसंगाने त्यांनी असेही सांगितले की एखादे चुकीचे कर्म घडले, एखादी अयोग्य कृती घडली, तर तिचा निचरा दुसऱ्या अयोग्य कर्माने होत नाही! ते म्हणाले, ''काट्याने काटा काढावयाचा तसे योग्य कर्माने (कृतीनेच) अयोग्य कर्मावर उपाय करावयाचा. जसे शेण लागले तर, आणखी शेणाने ते निघत नाही. (आपण आता काही करणार नाही, ही भूमिका योग्य नव्हे. सतत योग्य कर्माची दिशा पकडावी. प्रसंगी चूक झाल्यास रास्त कर्माने ती धुवून जाते. सारांश एकही क्षण वाया जाऊ न देता कर्म करावे.)'' अर्थात कर्म, विकर्म, अकर्म आणि सतत वेळेचा रास्त वापर हा कृति-सिद्धान्त होय. **क्रमशः**

**(उद्याच्या अंकात वाचा : जीवन विद्या मिशन)**

# आदरातिथ्यावर सरासरी दरवर्षीचा खर्च पूर्वीसारखाच - आशिष शेलार

**प्रतिनिधी**

मुंबई, गुरुवार - मुख्यमंत्री सचिवालयाच्या आदरातिथ्यावरील दरवर्षीच्या खर्चाची आकडेवारी पाहिली तर सरासरी सारखीच आहे. असे असताना काँग्रेसचे बेताल नेते संजय निरुपम हे बरळतात आणि त्याचीच री महाराष्ट्रातील जाणते नेतृत्त्व म्हणून ज्यांना ओळखले जाते, ते सन्माननीय शरद पवारही ओढतात, याचे नवल वाटते, असे मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी म्हटले आहे.

एकतर हा खर्च केवळ मंत्रालयातील मुख्यमंत्री सचिवालयाचा नाही तर सह्याद्री, वर्षा, नागपुरातील रामगिरी आणि हैदराबाद हाऊस यांचा एकत्रितपणे आहे. तो केवळ चहापानाचा नाही तर विविध

**शरद पवारांसारख्या जाणत्या नेत्याला याचीही माहिती असू नये, याचे आश्चर्य वाटते!**

विभागांच्या घेतल्या जाणाऱ्या बैठकींचा चहा, नाश्ता, सत्कार-स्वागतासाठी लागणारी सामुग्री, पुष्पगुच्छ, वेळोवेळी विदेशी शिष्टमंडळांसाठी आयोजित केले जाणारे आदरातिथ्य इत्यादींचा एकत्रित आहे. दुसरे काँग्रेस-राष्ट्रवादीच्या काळात बहुतेक वेळी परदेशातील शिष्टमंडळाच्या बैठकी या पंचतारांकित हॉटेल्समध्ये व्हायच्या, त्या आता सह्याद्रीला होत आहेत.

**वर्षनिहाय खर्च पुढीलप्रमाणे**

| वर्ष | खर्च |
| --- | --- |
| २०११-१२ | १,१६,६८,४६८ |
| २०१२-१३ | १,१५,९१,६८३ |
| २०१३-१४ | १,६०,४२,७२७ |
| २०१४-१५ | १,१४,२५,८११ |
| **(काँग्रेस-राष्ट्रवादीच्या काळात)** | |
| २०१५-१६ | ५७,९९,१५६ |
| २०१६-१७ | १,२०,९२,९७२ |
| २०१७-१८ | ३,३४,६४,९०५ |

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे यातील २०१७-१८ या वर्षांत जे देयक अदा करण्यात आले, तो खर्च दाखविण्यात आला आहे, याचा अर्थ ती संपूर्ण रक्कम त्या वर्षातील नाही तर गेल्यावर्षीची रक्कमसुद्धा त्यात अंतर्भूत आहे. त्याची नेमकी आकडेवारीसुद्धा लवकरच आपण जाहीर करू, असे आशिष शेलार यांनी सांगितले.

# राज्यात ११.२५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणणार - शिवतारे

**विशेष प्रतिनिधी**



मुंबई, गुरुवार - राज्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि बळीराजा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून डिसेंबर २०१९ अखेर ११.२५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात येईल, असे जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी सांगितले.

सदस्य शंभूराज देसाई यांनी काल विधानसभेत यासंदर्भात चर्चा उपस्थित केली होती. त्याला उत्तर देतांना शिवतारे बोलत होते. ते म्हणाले की, सिंचन प्रकल्पांची जी कामे ७५ टक्के पूर्ण झाली ती कामे पूर्ण करण्यावर गेल्या चार वर्षात प्रयत्न करण्यात आले. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या माध्यमातून राज्यात २६ प्रकल्प मंजूर असून त्यासाठी राज्याला केंद्र शासनाकडून ३८३० कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. त्यातून सुमारे ६ लाख हेक्टर सिंचनक्षेत्र निर्माण होणार आहे.

बळीराजा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून राज्यात ११२ प्रकल्प असून विदर्भ, मराठवाडा व शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यासाठी १० हजार ८६८ कोटी खर्च करण्यात येणार आहे.

२०५ प्रकल्पांना सुधारित प्रशाकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्यात उपलब्ध पाणीसाठ्याचा तंत्रशुद्ध पद्धतीने वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री जयंत पाटील, गणपतराव देशमुख, जयकुमार गोरे, अनिल बाबर, विरेंद्र जगताप, राजेंद्र पाटणी आदींनी भाग घेतला.

# राज्यात ४६ लाख लोकांची हरित सेना सज्ज

**प्रतिनिधी**

मुंबई, गुरुवार - राज्यात लोकसहभागातून ५० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला असून हरित महाराष्ट्राच्या चळवळीत सहभागी होण्यासाठी राज्यभरात ४६ लाख लोकांची हरित सेना सज्ज झाली आहे. २६ मार्च २०१८ रोजीच्या आकडेवारीनुसार राज्यात ४६ लाख ८ हजार ७९५ लोकांनी तसेच स्वयंसेवी संस्था, संघटनांनी हरित सेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे.

यामध्ये सर्वाधिक नोंदणी लातूर जिल्ह्यात झाली असून ती ४ लाख ६६ हजार १६७ इतकी आहे. त्या पाठोपाठ उस्मानाबाद जिल्ह्यात ३ लाख ९९ हजार ६६० तर बीड जिल्ह्यात ३ लाख ५५ हजार ३७४ इतकी हरित सेनेची नोंदणी झाली आहे. चौथ्या स्थानावर नाशिक जिल्हा असून तिथे २ लाख ७२ हजार १८५ नोंदणी झाली आहे. पाचव्या क्रमांकावर यवतमाळ जिल्हा आहे. तिथे २ लाख २७ हजार ५४० हरित सैनिकांची नोंद झाली आहे.



वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात अधिकाधिक लोकसहभाग वाढावा त्याचे लोकचळवळीत रुपांतर व्हावे म्हणून वन विभागाने महाराष्ट्र हरित सेना' स्थापन करण्याचे निश्चित केले आणि राज्यभरातून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या चळवळीत सहभागी होण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध आहे. त्यासाठी http://www.green-army.mahaforest.gov.in या तसेच http://www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करता येईल.

सध्या नोंदणीकृत झालेल्या ४६ लाख ८ हजार ७९५ हरित सैनिकांमध्ये ७५ हजार ९४४ संस्थांचा समावेश आहे. या माध्यमातून २८ लाख ८१ हजार ६३५ लोकांनी सदस्यत्व स्वीकारले आहे तर वैयक्तिक स्तरावर सदस्यत्व स्वीकारलेल्या लोकांची संख्या १७ लाख २७ हजार १६० इतकी आहे.

हरित सेनेच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणासाठी १ कोटी लोकांची फौज राज्यात निर्माण करण्याचा निर्धार वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. देशाच्या सीमेवर लढणारा सैनिक हा देशांच्या सीमांचे रक्षण करतो तर हरित सेनेच्या माध्यमातून हरित सेनेचे सदस्यत्व स्वीकारलेला सैनिक हा खऱ्या अर्थाने पर्यावरण संरक्षणाचा दूत असल्याचे वनमंत्री सांगतात.

वन विभागाने हरित सेनेच्या स्वयंसेवकांची भूमिका स्पष्ट करताना त्यांचा सहभाग अपेक्षित असलेली क्षेत्र निश्चित करून दिली आहेत. जसे वृक्ष लागवड, वृक्ष दिंडी, वनांच्या संरक्षणाकरिता सामूहिक गस्त, वणव्याच्या हंगामात वणवा विझवण्याच्या कामात प्रत्यक्ष सहभाग, वन्य प्राण्यांच्या गणनेत सहभाग, वन विभागामार्फत साजऱ्या केल्या जाणाऱ्या वसुंधरा दिन, पर्यावरण दिन, जागतिक वन दिन यासारख्या दिन विशेषांच्या कार्यक्रमात, वनमहोत्सव, वन्यजीव सप्ताहानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात हरित सेनेच्या सदस्यांना सहभागी होता येणार आहे.

हरित सेनेच्या संकेतस्थळाला भेट दिल्यानंतर या सर्व विषयांची सविस्तर माहिती मिळते. शिवाय याठिकाणी वन विभागाची दिनदर्शिकाही देण्यात आली आहे. या दिनदर्शिकेप्रमाणेही हरित सेनेचे सदस्य कार्यक्रम घेऊन पर्यावरण-वन रक्षणात आणि संवर्धनात आपले योगदान देऊ शकतात. गरज आहे सर्वांनी पुढं येऊन या वसुंधरेला अजून सुंदर करण्याची, स्वच्छ आणि सुंदर पर्यावरण राखण्याची. त्यामुळे हरित सेनेचा सदस्य होण्याची संधी सर्वांनी अवश्य घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# भाजप आमदार अमित साटम यांची अभियंत्याला शिवीगाळ?

**वृत्तसंस्था**

मुंबई, गुरूवार - भाजप आमदार अमित साटम यांनी महापालिकेच्या एका अभियंत्याला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याचे वृत्त आहे. विशेष महणजे साटम यांनी अभियंत्याला शिवीगाळ केल्याचा ऑडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

आमदार साटम यांनी पैसे उकळण्यासाठी धमकी दिल्याचा दावाही अभियंत्यांनी केला आहे. के-पश्चिम वॉर्डमधील राठोड (कनिष्ठ अभियंता) आणि पवार (सहाय्यक अभियंता) यांना साटम यांनी शिवीगाळ केल्याचा आरोप आहे.

अमित साटम हे भाजपकडून मुंबईतील अंधेरी पश्चिम भागातून निवडून आले आहेत. साटम आणि अभियंत्यांमधील फोन संभाषणाची एक क्लीप हाती लागली असून त्यात आमदार साटम यांनी अर्वाच्य भाषा वापरल्याचा दावा करण्यात येत आहे.

**आ. साटम यांनी आरोप फेटाळला**

हाती आलेल्या फोन संभाषणातील सुरुवातीचा आवाज आपला असला, तरी शिवीगाळ ऐकू येत असलेला संभाषणाचा भाग एडिट किंवा मॉर्फ करुन व्हायरल केल्याचा दावा अमित साटम यांनी केला आहे. पवार यांनी के-वेस्ट वॉर्ड सोडून दहा महिने झाले. म्हणजे हे संभाषण किमान एक वर्ष जुने असावे. असे कोणतेही संभाषण झाल्याचे आपल्या आठवत नाही, असा दावाही साटम यांनी केला. अभियंते पवार यांच्याशी आपले चांगले संबंध होते, त्यामुळे त्यांना शिवीगाळ करण्याचा प्रश्नच येत नाही.

# आज रंगणार अलबेला संगीतकार सी. रामचंद्र : शताब्दी अभिवादन सोहळा

**प्रतिनिधी**

मुंबई, गुरुवार - अलबेला संगीतकार सी. रामचंद्र : शताब्दी अभिवादन हा वैशिष्ट्यपूर्ण संगीतमय कार्यक्रम सीबीडी फाऊंडेशनने उद्या शुक्रवार दि, ३० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता सावरकर संकुल, शिवाजी पार्क येथे आयोजित केला आहे. याप्रसंगी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य आणि शिक्षणमंत्री विनोद तावडे प्रमुख पाहुणे असतील तर ज्येष्ठ संगीतकार आनंदजी आणि प्यारेलाल विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

आतापर्यंत सीबीडी फाऊंडेशनने सात दर्जेदार कार्यक्रम सादर केले असून याच मालिकेतील हा आठवा कार्यक्रम तशाच भव्य स्वरूपात सादर होणार आहे.

रामचंद्र नरहर चितळकर म्हणजेच सी.रामचंद्र हे चित्रपट संगीत क्षेत्रातील एक दिग्गज. त्यांच्या अनेक सुमधुर रचना आजही आपल्याला मंत्रमुग्ध करतात. त्यांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी ही तीन तासांची सुरेल मैफल सादर करण्यात येणार आहे. हिन्दी चित्रपट संगीताच्या सुवर्णकाळातील असंख्य दुर्मिळ गीतांचे संग्राहक डॉ. प्रकाश जोशी या कार्यक्रमाचे नियोजन आणि निवेदन करणार आहेत. त्यांना सुप्रसिद्ध निवेदक धनश्री प्रधान साथ देणार आहेत.

'अलबेला संगीतकार सी. रामचंद्र शताब्दी अभिवादन' हा कार्यक्रम झी २४ तास' ही आघाडीची मराठी वृत्तवाहिनी नंतर प्रसारित करणार आहे.

कोणत्याही परिस्थितीत चुकवू नये असा हा कार्यक्रम सीबीडी फाऊंडेशनच्या आधीच्या कार्यक्रमांप्रमाणे रसिकांसाठी खुला राहणार आहे, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# घरफोडीच्या वॉण्टेड आरोपीस वर्षभरानंतर अटक

**प्रतिनिधी**

मुंबई, गुरुवार - घरफोडीच्या गुन्ह्यांत वॉण्टेड आरोपीस एक वर्षांनी एल. टी मार्ग पोलिसांनी अटक केली. इंद्रसेन गयाप्रसाद चौरसिया असे या आरोपीचे नाव असून याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत असल्याचे पोलिसांनी सांगितले. सोन्याचे व्यापारी असलेले विनोद धनराज सोनेया हे त्यांच्या कुटुंबियांसोबत ठाकूरद्वार रोडवरील मिठा मॅन्शन इमारतीमध्ये राहतात. २८ एप्रिल ते ३० एप्रिल २०१७ यादरम्यान ते त्यांच्या कुटुंबियांसोबत सुरत येथे जैन धर्मियांच्या कार्यक्रमाला गेले होते. याचदरम्यान त्यांच्या घरी घुसून काही अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करुन सुमारे ७० लाख रुपयांचा ऐवज पळवून नेला होता. हा प्रकार नंतर उघडकीस येताच त्यांनी एल. टी मार्ग पोलिसांत तक्रार केली होती. या आरोपीचा शोध सुरु असतानाच काल इंद्रसेन चौरसिया याला पोलिसांनी अटक केली. चौकशीत त्याने ही घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याला या गुन्ह्यांत पोलिसांनी अटक केली. इंद्रसेन हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध चोरीसह जबरी चोरी आणि घरफोडीच्या काही गुन्ह्यांची नोंद आहे. याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत असून त्याची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे.

# गोरेगाव येथे अल्पवयीन तरुणावर हल्ला

मुंबई, गुरुवार (प्रतिनिधी) - गोरेगाव येथे एका अल्पवयीन तरुणावर हल्ला करुन पळून गेलेल्या मारेकऱ्याचा गोरेगाव पोलीस शोध घेत आहेत. त्याच्याविरुद्ध पोलिसांनी हत्येचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदविला आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या साधू यादववर सिद्धार्थ रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

ही घटना काल दुपारी दिड वाजता गोरेगाव येथील राममंदिर, गांधी चाळीजवळ घडली. साधू यादव हा सतरा वर्षांचा तरुण याच परिसरात राहतो. काल दुपारी दिड वाजता तो गांधी चाळीजवळ उभा होता, यावेळी एका व्यक्तीने त्याच्याकडे माचिस मागितले, मात्र त्याच्याकडे माचिस नसल्याने त्याने त्याला माचिस देण्यास नकार दिला.

त्याचा राग आल्याने या व्यक्तीने त्याच्याकडील घातक शस्त्राने त्याच्यावर वार केले, त्यात त्याच्या उजव्या बरगडीला गंभीर दुखापत झाली होती. या घटनेनंतर ही व्यक्ती तेथून पळून गेली. ही माहिती स्थानिक रहिवाशांकडून समजताच गोरेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी झालेल्या साधूला पोलिसांनी तातडीने सिद्धार्थ रुग्णालयात दाखल केले असून तिथे त्याच्यावर उपचार सुरु आहेत. त्याची प्रकृती आता स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# रालोआच्या शिष्टमंडळासह रामदास आठवले यांनी घेतली पंतप्रधानांची भेट

**ॲट्रॉसिटीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध केंद्र सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करण्याची केली मागणी**



**प्रतिनिधी**

मुंबई, गुरुवार - ॲट्रॉसिटी कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अन्यायकारक निर्णयाविरुद्ध केंद्र सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

नरेंद्र मोदींनी मन की बातद्वारे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित न्यू इंडिया उभारण्याचा संकल्प जाहीर केला. त्याचे स्वागत करून देशभरातील मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी चार प्रमुख मागण्यांवर पंतप्रधान मोदींशी चर्चा झाली. यावेळी एनडीएमधील खासदारांचे शिष्टमंडळ केंद्रीयमंत्री रामविलास पासवान यांच्या नेतृत्वात नरेंद्र मोदींना भेटले. त्यावेळी विविध मागण्यांचे निवेदन रिपब्लिकन पक्षाच्यावतीने रामदास आठवलेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना सुपूर्द केले. यावेळी केंद्रीयमंत्री रामविलास पासवान, केंद्रीयमंत्री थावरचंद गेहलोत, केंद्रीय राज्यमंत्री ज्युएल ओराम, केंद्रीय राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल, अजय टमटा, विजय सांपला, खासदार उदित राज, खा. अमर साबळे, खा. आनंदराव अडसूळ, संभावप्रसाद तुंडिया आदी मान्यवरांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेऊन चर्चा केली.

ॲट्रॉसिटीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध पुनर्विचार याचिका दाखल करावी या मागणीबरोबरच अनुसूचित जातीजमातीला पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी केंद्र सरकारने त्याबाबतचे विधेयक संसदेत मांडावे ही महत्वपूर्ण मागणी करण्यात आली आहे. रामदास आठवलेंनी नरेंद्र मोदींकडे केलेल्या चार प्रमुख मागण्यांमध्ये देशभरातील अनुसूचित जाती जमातीच्या भूमिहीनांना त्यांच्या उपजीविकेसाठी प्रत्येकी ५ एकर जमीन संबंधित राज्य सरकारमार्फत देण्यात यावी आणि अनुसूचित जातीजमाती; अन्य मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मॅट्रिक पूर्व आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती रकमेमध्ये वाढ करण्यात यावी या मागण्यांचा समावेश आहे.

नरेंद्र मोदी हे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना मानणारे आहेत. त्यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकार हे देशभरातील अनुसूचित जातीजमतीच्या हितासाठी कार्यरत आहेत. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतूनच भारत महासत्ता होणार असून त्या दृष्टीने न्यू इंडिया उभारण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी केला असल्याने आज त्यांची भेट घेऊन देशभरातील अनुसूचित जातीजमातीच्या प्रमुख मागण्यांचे निवेदन सोपविले असल्याची माहिती रामदास आठवलेंनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस केंद्रीयमंत्री रामविलास पासवान आणि रामदास आठवलेंनी एकत्रित संबोधित केले.

**नवशक्ति रोजगाराच्या संधी**

नोकरी शोधताय? बरेच प्रयत्न करूनही कुठेच यश मिळत नाही?




नोकरीसाठी अर्ज करून-करून थकलात? नोकरी देणाऱ्या वेबसाईट्स आणि वर्तमानपत्रं वाचून वैतागलात? आता वाचा नवशक्ति रोजगार संधी. तुमच्या आवडीची नोकरी मिळवण्यास मदत करणारा मदतनीस म्हणजे नवशक्ति रोजगार संधी...

**गुरुवारी वाचायला विसरू नका**

# लुटमारप्रकरणी दोन आरोपींना अटक व कोठडी

**प्रतिनिधी**

मुंबई, गुरुवार - काळाचौकी येथे एका महिलेच्या घरी लुटमार करुन पळून गेलेल्या दोन आरोपींना काळाचौकी पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर या दोघांनाही येथील स्थानिक न्यायालयाने ६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

अवधेश राजकुमार विश्कर्मा आणि अजय ॲग्निल हवाले अशी या दोघांची नावे असल्याचे पोलिसांनी सांगितले. अजमिराबीबी आलमगीर खान ही महिला शिवडीतील स्वान मिल म्हाडा संकुल इमारतीमध्ये राहते. सोमवारी दुपारी साडेतीन वाजता अजमिराबीबी ही तिच्या तीन वर्षांची मुलगी मरियम हिच्यासोबत घरी होती. यावेळी तिच्या घराची बेल वाजली म्हणून तिने दरवाजा उघडला.

यावेळी समोर दोन तरुण होते, या दोघांनी तिच्याकडे पाणी पिण्यासाठी मागितले. ती पाणी आणणसाठी आत गेली असता ते दोघेही तिच्यामागून घरात शिरले. यावेळी मरियमच्या गळ्यावर चाकू ठेवून त्यांनी पैशांची मागणी केली. त्यानंतर या दोघांनी कपाटातील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा १ लाख ५४ हजार रुपयांचा ऐवज पळवून नेला होता. ही माहिती मिळताच काळाचौकी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

दिवसाढवळ्या एका निवासी इमारतीमध्ये झालेल्या या लुटमारीच्या घटनेने स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी काळाचौकी पोलिसांनी रॉबरीच्या गुन्ह्यांची नोंद करुन पळून गेलेल्या दोन्ही आरोपींना वडाळा परिसरातून अटक केली. चौकशीत त्यांनी या गुन्ह्यांची कबुली देताना काही दागिने एका ज्वेलर्सला विकल्याचे सांगितले. या ज्वेलर्सकडून पोलिसांनी चोरीचे दागिने जप्त केले आहेत.

# दोन गुन्ह्यांत साडेसहा लाखांची लूट

मुंबई, गुरुवार (प्रतिनिधी) - चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यांत साडेसहा लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी पळवून नेला. विक्रोळी आणि काळाचौकी परिसरात घडलेल्या या दोन्ही घटनेने स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड खळबळ उडाली होती.

सुषमा कुणाल परमार ही महिला लालबाग येथे राहते. काल दुपारी घरी असताना तिच्या घरात अज्ञात व्यक्तीने प्रवेश मिळवून कपाटातील सुमारे सव्वाचार लाख रुपयांचे सोन्याचे दागिने पळवून नेले. याप्रकरणी काळाचौकी पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदविला होता. घरफोडीची घटना विक्रोळी परिसरात घडली. टागोरनगरच्या एका निवासी इमारतीमध्ये लता कुंदन भालेराव ही महिला राहते. गेल्या महिन्यांत लता या बाहेरगावी गेल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी त्या त्यांच्या घरी आल्या असता त्यांना घरातील कडी कोयंडा, कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसून आले. त्यांनी आत जाऊन पाहणी केल्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या घरातील सुमारे अडीच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने घेऊन पलायन केल्याचे निदर्शनास आले.

**TATA**

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India

Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724

Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com

CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ९१ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १०(१) अन्वये **सूचना याद्वारे देण्यात येते की,** प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर निर्गमित करण्यात आलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचीबद्ध नॉन कर्न्व्हटेबल डिबेंचर्सवरील व्याजाचे थकीत खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | नॉन कर्न्व्हटेबल डिबेंचर्स (एनसीडीज्) | रोजी नियत व्याज | व्याज देयाकरिताची नोंदीत तारीख |
| --- | --- | --- | --- |
| १ | रु. १,५०० कोटी एकूणसाठी २३ एप्रिल, २०१२ रोजी वाटप झालेले २% एनसीडीज् (ISIN:INE081A08181) | २३ एप्रिल, २०१८ | १७ एप्रिल, २०१८ |

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
सौ. अनिता कल्याणी
अंतरिम कंपनी सचिव

२९ मार्च, २०१८
मुंबई

TATA STEEL